महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एमआयएस-०१२२/प्र.क्र.२०/२०२२/३१ दिनांक- १७ जुलै, २०२३

**- : प्रसिद्धीपत्रक:-**

**विषय :-** लिपिक टंकलेखक- २०२२ व कर सहायक -२०२२ या संवर्गांच्या टंकलेखन कौशल्य चाचणीबाबत.
**संदर्भ :-** (१) जाहिरात क्रमांक ११३/२०२२ आणि ११५/२०२२
(२) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ०३ जुलै, २०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक २४ व २५ जुलै, २०२३ रोजी लिपिक टंकलेखक २०२२ व कर सहायक २०२२ या संवर्गासाठी टंकलेखन कौशल्य चाचणी आयोजित करण्यात आली आहे.

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: अपंग-२०१६/प्र.क्र.११६/१६-अ, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ नुसार पात्र दिव्यांग उमेदवारांना टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाची सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे त्यांना टंकलेखन अर्हता चाचणी अनिवार्य नाही.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१८०/२८, दिनांक १३ जुन, २०१९ नुसार पात्र माजी सैनिक उमेदवारांना टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाची सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे त्यांना टंकलेखन अर्हता चाचणी अनिवार्य नाही.

तसेच शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक: अनाथ-२०२२/प्र.क्र.८४/का-०३, दिनांक ०७ जुलै, २०२२ नुसार पात्र अनाथ उमेदवारांना टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाची सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे त्यांनाही टंकलेखन अर्हता चाचणी अनिवार्य नाही.

३. उपरोक्त नमुद शासन निर्णयांनुसार पात्र दिव्यांग, माजी सैनिक व अनाथ उमेदवारांना टंकलेखन अर्हता चाचणी अनिवार्य नाही. यास्तव सदर उमेदवारांनी दिनांक २४ व २५ जुलै, २०२३ रोजी घेण्यात येणा-या टंकलेखन कौशल्य चाचणीस उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : नवी मुंबई

सह सचिव,
दक्षता, धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग